www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -19, अंक-50 ■ छत्रपती संभाजीनगर, दि. सोमवार, 17 ऑगस्ट 2026 ■ किंमत 2 रुपये, पाने -4

## देशाचा ८०वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

# सर्वसामान्य माणूस हाच विकासाचा केंद्रबिंदू- पालकमंत्री संजय शिरसाट

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

विविधतेने नटलेला आपला देश एकसंघ ठेवण्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या राज्यघटनेचे मोठे योगदान आहे. जिल्ह्याचा विकास करत असतांना सर्वसामान्य माणूस हाच केंद्रबिंदू आहे. आपण समाजातील सर्व घटक मिळून विकास प्रक्रियेत सहभागी होऊ,असे आवाहन राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज केले.

देशाचा ८० वा स्वातंत्र्य दिन आज मोठ्या उत्साहात साजरा झाला. जिल्ह्याचा मुख्य शासकीय सोहळा विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणात पार पडला. प्रारंभी वंदेमातरम गायन झाले. त्यानंतर पालकमंत्री शिरसाट यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. पोलीस वाद्यवृंदाच्या तालावर राष्ट्रगीत होऊन राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली. त्यानंतर राज्यगीत झाले.

आपल्या संबोधनात पालकमंत्री शिरसाट यांनी स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण केले. हुतात्म्यांना अभिवादन करुन आदरांजली वाहिली.

सोहळ्यास विधानपरिषदेचे सदस्य आ. अंबादास दानवे, माजी खा. चंद्रकांत खैरे, विभागीय आयुक्त जी.श्रीकांत,जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मनपा आयुक्त अमोल येडगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम.,छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, जिल्हा पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव तसेच सर्व वरिष्ठ अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, स्वातंत्र्य सैनिक, लोकप्रतिनिधी आदी उपस्थित होते.




त्यानंतर ते म्हणाले की,देशाचा स्वातंत्र्य दिन साजरा होत असतांना या आनंदात प्रत्येक देशवासी सहभागी झाला आहे.आपापसातले सर्व भेद विसरुन सर्व जाती धर्माचे लोक एकत्रितपणे स्वातंत्र्याचा आनंद घेत आहेत, हे या देशाचे वैशिष्ट्य आहे. विविधतेने नटलेला हा देश एकसंघ ठेवण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या राज्यघटनेचे मोठे योगदान आहे. आपल्या सगळ्यांसाठी आपली राज्यघटना सर्वोपरी आहे. आपल्या आधीच्या पिढ्यांनी केलेल्या त्याग आणि बलिदानामुळेच हे स्वातंत्र्य आपण उपभोगत आहोत,याचे स्मरण प्रत्येकाने ठेवावे असे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, आपले राज्य प्रगती करत असतांना शासनाचा केंद्रबिंदू हा सर्वसामान्य माणूस आहे. विकास करतांना तो सर्व घटकांचा झाला पाहिजे, हेच शासनाचे धोरण आहे. आपण सर्व मिळून त्यात सहभागी होऊ. एकत्रितपणे देशाचा विकास करु,असे आवाहन त्यांनी केले. जिल्ह्यात शासनामार्फत विविध योजनांद्वारे लोकांना देण्यात येत असलेला लाभ, घाटी रुग्णालयाला सुपर स्पेशालिटी रुग्णालय बनविण्याचा संकल्प, खेळाडूंसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा, अत्याधुनिक अग्निशामक दल अशा अनेक सुविधा उपलब्ध करुन देत असल्याबाबत त्यांनी उपस्थितांना सांगितले.

**जलसंधारणाची शपथ**

त्यानंतर पालकमंत्री शिरसाट यांनी सगळ्यांना जलसंधारण सप्ताहाची शपथ दिली. तसेच यानिमित्ताने राबविण्यात येणाऱ्या सप्ताहाच्या लोगोचे अनावरणही पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच विविध पुरस्कार वितरण व लोकार्पण सोहळ्याला पालकमंत्र्यांनी उपस्थिती लावली. उपस्थित स्वातंत्र्य सैनिक, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आदिंना भेटून त्यांनी स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

**स्वच्छता वाहनांचे लोकार्पण-** याप्रसंगी पालकमंत्री शिरसाट यांच्या हस्ते सात जेटींग स्वच्छता वाहनांचे लोकार्पण करण्यात आले. ही वाहने छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, कन्नड, पैठण, सोयगाव, वैजापूर, फुलंब्री, गंगापुर या नगरपालिकांना वितरीत करण्यात आली.

**कक्ष नुतनीकरण उद्घाटन -** त्यानंतर पालकमंत्री शिरसाट यांनी विभागीय आयुक्त कार्यालयातील दालन व कक्ष नुतनीकरणाचे उद्घाटन करुन पाहणी केली व

### याप्रसंगी वितरीत करण्यात आलेले पुरस्कार

पोलीस उत्कृष्ट सेवा पदक- छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र, पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अपर पोलीस अधीक्षक शशिकांत शिंगारे, पोलीस उपायुक्त शशिकांत सातव. अति उत्कृष्ट सेवा पदक-सुभाष भुजंग, उपविभागीय पोलीस अधिकारी सिल्लोड विश्वजीत काईगडे, अविनाश आघाव, अमोल देशमुख, अविनाश बागुल, रफिक पठाण, किरण गावंडे, इम्तियाज अहमद, विठ्ठल राख, प्रदीप धनवे, बाळू थोरात, आत्माराम पैठणकर, देविसिंग ठाकूर, शिरीष वाघ, विनोद आघाव.

## जिल्हा परिषदेत अध्यक्ष अविनाश गलांडे यांच्या हस्ते ध्वजारोहण; उपक्रमांनी स्वातंत्र्य दिन साजरा

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ८० व्या वर्धापनदिनानिमित्त जिल्हा परिषदेच्या प्रांगणात अध्यक्ष अविनाश गलांडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल यांची प्रमुख उपस्थिती होती. अर्थ व बांधकाम सभापती सचिन गर्ड, आरोग्य व शिक्षण सभापती अनिता मोठे, महिला व बालकल्याण सभापती मीनाक्षी पवार, समाज कल्याण सभापती बालाजी सोनटक्के, जी. पं. गटनेते गंगाधरन पगडे, सुभाषर शिंदे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू पी. एम. यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

ध्वजारोहणानंतर उपस्थित कर्मचाऱ्यांना तंबाखूमुक्ती, बालविवाह, नशामुक्त नवसाक्षरतेची शपथ देण्यात आली. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे यांनी मार्गदर्शन केले. अधिकारी आणि पदाधिकारी हे रथाचे दोन चाके असून दोघांनी समन्वयाने काम केल्यास जिल्ह्याचा विकास साधता येईल, असे त्यांनी सांगितले. उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल यांनीही स्वातंत्र्य दिनाच्या सर्व कर्मचारी व उपस्थितांना शुभेच्छा दिल्या.



जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू पी. एम. यांनी मार्गदर्शन करताना जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरील अधिकाऱ्यांनी उत्कृष्ट काम करून राज्यात जिल्हा परिषदेला मानाचे स्थान मिळवून दिल्याचे सांगितले. जानेवारी ते जुलै २०२६ दरम्यान सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. तसेच साक्षरता प्रमाणपत्राचे वाटप आणि चार स्वयंसेवक समूहांना महिंद्रा पिकअप बोलेरो वाहनांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी देशभक्तीपर गीत, नृत्य व नाटिका सादर करून उपस्थितांची मने जिंकली. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोलंके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) राजेंद्र घोरपडे, मुख्य वित्त अधिकारी शिवप्रसाद जटाळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत चंद्रहार ढोके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विशाल बेंद्रे, जिल्हा कृषी अधिकारी प्रकाश पाटील, ग्रामीण पाणीपुरवठ्याचे कार्यकारी अभियंता बाळासाहेब शेळके, सहाय्यक गटविकास अधिकारी साहेबराव चव्हाण, सिंचन विभागाचे कार्यकारी अभियंता कपिल बिडगार, शिक्षणाधिकारी माध्यमिक अविनाश लाटकर, (मबाक) विभागाच्या जिल्हा कार्यक्रमाधिकारी डॉ. मंगल पांचाळ, उप आयुक्त पशुसंवर्धन अधिकारी डॉ. नानासाहेब कदम, उपअभियंता यांत्रिकी दत्तात्रय श्रीखंडे, शिक्षणाधिकारी योजना राकेश माळबुके यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विस्तार अधिकारी संगीता साळुंके व कृष्णा शिंदे यांनी केले.

## पंचायत समितीत कल्याण गायकवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण; स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त पंचायत समिती छत्रपती संभाजीनगर येथे स्वातंत्र्य दिनाचा सोहळा उत्साहात आणि देशभक्तीपूर्ण वातावरणात पार पडला. पंचायत समितीचे सभापती कल्याण गायकवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत उपस्थितांनी राष्ट्रगीत गायले. कार्यक्रमाला पंचायत समितीचे पदाधिकारी, सदस्य, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ध्वजारोहण कार्यक्रमानंतर पंचायत समितीच्या वतीने 'माझं गाव आरोग्य संपन्न गाव' या उपक्रमांतर्गत व्यसनमुक्ती आणि तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन टाळण्याबाबत सामूहिक शपथ घेण्यात आली. आरोग्यदायी समाज निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने व्यसनांपासून दूर राहण्याची गरज असून, तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणामांबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

स्वातंत्र्य दिन हा केवळ ध्वजारोहणाचा दिवस नसून देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण करण्याचा आणि देशाच्या प्रगतीसाठी आपले योगदान देण्याचा दिवस असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले. ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य, शिक्षण



आणि विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. या कार्यक्रमास उपसभापती पुंडलिक गाढे पाटील, गटविकास अधिकारी शिवाजी साळुंके, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रसन्न भाले यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच पंचायत समितीचे सदस्य सरोजाव चव्हाण, अनुराग शिंदे, बाबासाहेब राठोड, श्रीमती चारुशीला गावंडे, सुमन चव्हाण, रत्नमाला ढमढेरे, पूजा घोडके, अर्चना बोनगाने, सुंदा अडसुळे, गायाबाई ठोंबरे, दत्तात्रय वरे, सतीश हिवाळे आदी सदस्य उपस्थित होते.

# भारत आज ऊर्जा क्षमता वाढवणाऱ्या देशांमध्ये

आज भारताकडे ऊर्जा क्षेत्रात जगाला मार्गदर्शन करण्याची क्षम ता आहे; मात्र देशातील प्रत्येक घर, शेत, शाळा आणि रुग्णालयाला समान गुणवत्तेची वीज मिळेल तेव्हाच त्या नेतृत्वाला खरी प्रतिष्ठा मिळेल. ऊर्जा सुरक्षा हा प्रवासाचा पहिला टप्पा होता. आता ऊर्जा न्याय हेच भारताच्या विकासाचे पुढील ध्येय असले पाहिजे. कारण विजेचा प्रकाश केवळ बल्ब नाही, तर समाजातील संधी, समानता आणि विकासाची नवी दिशा उजळवतो.

भारताने गेल्या दशकभरात ऊर्जा क्षेत्रात केलेली प्रगती जगासाठी अभ्यासाचा विषय ठरली आहे. एके काळी वीजटंचाई, भारनियमन आणि अपुऱ्या उत्पादनामुळे ओळखला जाणारा भारत आज जगातील सर्वाधिक वेगाने ऊर्जा क्षमता वाढवणाऱ्या देशांमध्ये गणला जातो. कोळशावर आधारित प्रकल्पांबरोबरच सौर, पवन, जल आणि अणुऊर्जा या क्षेत्रांमध्ये मोठी गुंतवणूक झाली आहे. देशाची एकूण स्थापित वीजनिर्मिती क्षमता दुपटीहून अधिक वाढली आहे. राष्ट्रीय वीजग्रीडची क्षमता विस्तारली आहे. नवीकरणीय ऊर्जे तील भारताची झेप जागतिक पातळीवर कौतुकास्पद मानली जात आहे; मात्र या सर्व यशामागे एक मूलभूत प्रश्न आजही अनुत्तरित आहे, तो म्हणजे देशात पुरेशी वीज निर्माण होत असली, तरी प्रत्येक नागरिकापर्यंत समान गुणवत्तेने पोहोचते का? हा प्रश्न केवळ तांत्रिक नाही, तर सामाजिक, आर्थिक आणि लोकशाही मूल्यांशी संबंधित आहे. कारण ऊर्जा म्हणजे केवळ उद्योगधंद्यांचे इंधन नाही, तर ती शिक्षण, आरोग्य, शेती, रोजगार आणि सन्मानपूर्वक जगण्याचा पाया आहे. त्यामुळे भारताच्या ऊर्जाधोरणाचा पुढील टप्पा केवळ 'ऊर्जा सुरक्षा' नसून 'ऊर्जा न्याय' असला पाहिजे. गेल्या दहा वर्षांमध्ये केंद्र सरकारने ऊर्जा क्षेत्रात मोठी गुंतवणूक केली. ग्रामीण विद्युतीकरणाला गती मिळाली. घराघरांमध्ये वीज जोडणी देण्याची मोहीम राबवण्यात आली.(डेश्ररी-र्हुशीशव) विशेष भर देण्यात आला. आज देशाची एकूण वीजनिर्मिती क्षमता ५२० गीगावॉटपेक्षा अधिक झाली आहे. त्यापैकी निम्म्याहून अधिक क्षमता जीवाश्म इंधनाव्यतिरिक्तच्या स्रोतांमधून उपलब्ध होत आहे.

भारताने हवामानबदलाच्या पार्श्वभूमीवर हरित ऊर्जेच्या दिशेने महत्त्वपूर्ण वाटचाल केली आहे. त्यामुळे ऊर्जा संक्रमणाच्या जागतिक चर्चेत भारताचे स्थान अधिक मजबूत झाले आहे; मात्र राष्ट्रीय पातळीवरील ही प्रगती प्रत्येक गावात, प्रत्येक शेतात आणि प्रत्येक घरात सारखीच अनुभवाला येते, असे म्हणता येणार नाही. अनेक दुर्गम आदिवासी भाग, डोंगराळ प्रदेश आणि सीमावर्ती गावे आजही खंडित वीजपुरवठ्याच्या समस्येला सामोरे जात आहेत. शहरात रोहित्र बिघडल्यास काही तासांमध्ये दुरुस्ती होते; परंतु ग्रामीण भागात अनेकदा दोन-दोन दिवस वीजपुरवठा खंडित राहतो. शेतीपंपांसाठी रात्रीच्या वेळी वीज दिली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना रात्रभर जागून पाणी द्यावे लागते. अनेक गावांमध्ये कमी दाबामुळे मोटारी चालत नाहीत. याचा थेट परिणाम शेतीच्या उत्पादकतेवर होतो. देशात शंभर टक्के घरांना वीजजोडणी मिळाल्याचा दावा केला जातो; परंतु मीटर बसवणे आणि चोवीस तास दर्जेदार वीज मिळणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. अनेक घरांमध्ये जोडणी आहे; पण अनियमित पुरवठा, कमी व्होल्टेज किंवा वारंवार होणाऱ्या खंडित सेवेमुळे त्या जोडणीचा अपेक्षित फायदा होत नाही. ऊर्जा न्याय म्हणजे केवळ वीज उपलब्ध असणे नव्हे, तर ती विश्वासार्ह, सुरक्षित आणि परवडणारी असणेही तितकेच महत्त्वाचे आहे.(खपवळर)

ऊर्जा क्षेत्रातील दुसरी मोठी समस्या म्हणजे वितरण व्यवस्थेतील विषमता. महानगरांमध्ये खासगी वितरण कंपन्यांमुळे ग्राहक सेवा, ऑनलाइन बिलिंग आणि तक्रार निवारणामध्ये सुधारणा झाली आहे; परंतु ग्रामीण आणि लहान शहरांमध्ये अजूनही जुन्या तारांचे जाळे, अपुरी उपकेंद्रे, कमी क्षमतेची रोहित्रे आणि देखभालीचा अभाव ही वास्तवस्थिती आहे. परिणामी, राष्ट्रीय स्तरावर उत्पादन वाढले असले, तरी वितरणातील कमतरतेमुळे अंतिम ग्राहकाला त्याचा पूर्ण लाभ मिळत नाही. वीजवितरण कंपन्यांच्या आर्थिक सुधारणांवर गेल्या काही वर्षांमध्ये विशेष भर देण्यात आला आहे. तांत्रिक आणि व्यापारी तोटे कमी झाले आहेत. अनेक कंपन्यांची आर्थिक स्थिती सुधारली आहे; परंतु कोणत्याही वितरण कंपनीचे यश तिच्या नफ्यावर मोजता येत नाही. तिचे खरे यश गरीब, शेतकरी, लघुउद्योजक आणि दुर्गम भागातील नागरिकांना सातत्यपूर्ण वीज उपलब्ध करून देण्यात आहे. आर्थिक सुधारणा झाल्या आणि सेवा निकृष्टच राहिली, तर त्या सुधारणांचा सामान्य नागरिकाला काय उपयोग? वीज वितरणामध्ये राजकीय हस्तक्षेप ही आणखी एक गंभीर समस्या आहे. अनेक राज्यांमध्ये वीजदर हे आर्थिक वास्तवापेक्षा राजकीय समीकरणांवर ठरतात. मोफत वीज, अनुदाने आणि थकबाकीमुळे वितरण कंपन्यांवर आर्थिक ताण वाढतो. सरकारकडून अनुदानाची रक्कम वेळेवर न मिळाल्यास पायाभूत सुविधांच्या देखभालीवर परिणाम होतो. परिणामी ग्राहकांना दर्जेदार सेवा देण्यात अडचणी निर्माण होतात. त्यामुळे ऊर्जा क्षेत्रात आर्थिक शिस्त आणि सामाजिक जबाबदारी यांचा समतोल आवश्यक आहे.

# गांधींचे सावरकरांवरील वक्तव्य : इतिहासावर बोलताना विवेक जागा असावा!

इतिहासातील व्यक्ती, घटना आणि विचार यांच्यावर चर्चा होणे ही लोकशाही समाजाची गरज आहे. इतिहास हा केवळ भूतकाळाचा संग्रह नाही; वर्तमान समजून घेण्यासाठी आणि भविष्याचा विचार करण्यासाठी तो आवश्यक असतो. मात्र इतिहासावर बोलताना संदर्भ, पुरावे आणि भाषेची जबाबदारी विसरली गेली, तर अभ्यासाची जागा आरोप घेतात आणि चर्चेचे रूप वादात बदलते. त्यानंतर हा वाद न्यायालयापर्यंत पोहोचतो आणि मूळ ऐतिहासिक प्रश्न बाजूला पडून कायदेशीर संघर्ष महत्त्वाचा ठरतो.

राहुल गांधी यांनी विनायक दामोदर सावरकर यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्यावरून निर्माण झालेल्या प्रकरणाने पुन्हा एकदा हाच प्रश्न समोर आणला आहे. १७ नोव्हेंबर २०२२ रोजी महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्यात भारत जोडो यात्रेदरम्यान राहुल गांधी यांनी सावरकरांविषयी काही विधाने केली. त्यानंतर अधिवक्ता नृपेंद्र पांडे यांनी फौजदारी तक्रार दाखल केली आणि त्यावर लखनौमधील न्यायालयाने राहुल गांधी यांना समन्स बजावले होते. या प्रकरणात भारतीय दंड संहितेतील कलम १५३-अ आणि ५०५ अंतर्गत आरोपांचा संदर्भ होता. वृत्तमाध्यमांनी त्याला अनेकदा 'मानहानी प्रकरण' असे संबोधले असले, तरी कायदेशीरदृष्ट्या त्यातील आरोप आणि आवश्यक सरकारी मंजुरीचा प्रश्न वेगळा होता.

एप्रिल २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणातील कार्यवाहीला स्थगिती दिली होती. त्यावेळी न्यायालयाने राहुल गांधी यांच्या सावरकरांविषयीच्या वक्तव्यावर नाराजी व्यक्त केली होती आणि स्वातंत्र्यलढ्यातील व्यक्तींविषयी बोलताना अधिक जबाबदारीची अपेक्षा व्यक्त केली होती. म त्र १४ ऑगस्ट २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाला वेगळ्या कायदेशीर आधारावर अंतिम स्वरूप दिले. न्यायमूर्ती दीपंकर दत्ता आणि न्यायमूर्ती शील नागू यांच्या खंडपीठाने राहुल गांधी यांच्याविरुद्धची फौजदारी तक्रार आणि समन्स रद्द केले. संबंधित आरोपांसाठी आवश्यक असलेली सरकारी मंजुरी घेण्यात आली असल्याचे दाखवता आले नव्हते. त्यामुळे त्या मंजुरीअभावी फौजदारी कार्यवाही पुढे चालू ठेवता येणार नाही, असा न्यायालयाचा निष्कर्ष होता. या निर्णयाचा एक महत्त्वाचा अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने सावरकरांविषयी राहुल गांधी यांनी केलेले विधान ऐतिहासिकदृष्ट्या योग्य किंवा अयोग्य ठरवलेले नाही. न्यायालयाने त्या ऐतिहासिक वादाचा अंतिम निवाडा केलेला नाही. निर्णयाचा आधार आवश्यक कायदेशीर मंजुरीचा अभाव हा होता. त्यामुळे न्यायालयाने राहुल गांधींच्या विधानाला मान्यता दिली, असा अर्थ काढणे चुकीचे ठरेल; त्याचप्रमाणे न्यायालयाने ते विधान चुकीचे ठरवले, असे म्हणणेही योग्य ठरणार नाही.

यातून मोठा सामाजिक प्रश्न पुढे येतो इतिहासातील प्रत्येक मतभेद न्यायालयात नेण्याची गरज आहे का? माझ्या मते, शक्यतो नाही.

इतिहास हा मतभेदांचा विषय असू शकतो. एका व्यक्तीच्या कार्याचे मूल्यमापन दुसरा व्यक्ती वेगळ्या पद्धतीने करू शकतो. एखाद्या ऐतिहासिक निर्णयाचे सम र्थन करणारे आणि त्यावर टीका करणारे दोन्ही प्रवाह असू शकतात. संशोधक, लेखक, राजकीय नेते, पत्रकार आणि सामान्य नागरिक यांना इतिहासावर आपापली मते मांडण्याचा अधिकार असला पाहिजे. लोकशाहीमध्ये इतिहासाच्या चर्चेला कुलूप लावणे योग्य नाही.

परंतु अभिव्यक्ती स्वातंत्र्याबरोबर अभिव्यक्तीची जबाबदारीही येते. विशेषतः सार्वजनिक जीवनातील व्यक्तींनी एखाद्या ऐतिहासिक व्यक्तीविषयी बोलताना शब्दांची निवड अधिक काळजीपूर्वक करणे अपेक्षित आहे. एखादा दावा करताना त्यामागे कोणता दस्तऐवज आहे, कोणता ऐतिहासिक संदर्भ आहे, कोणत्या अभ्यासाचा आधार आहे आणि त्या विधानाचा नेमका अर्थ काय निघतो, याचा विचार केला पाहिजे. इतिहास हा घोषणांनी नव्हे, तर पुराव्यांनी समजतो.

आज सामाजिक माध्यमांमुळे काही सेकंदांत एखादे विधान लाखो लोकांपर्यंत पोहोचते. भाषणातील एखादे वाक्य संदर्भापासून वेगळे केले जाऊ शकते. त्यावर प्रतिक्रिया उमटतात. समर्थक आणि विरोधक आपापल्या पद्धतीने त्याचा अर्थ लावतात. शेवटी इतिहासावरील चर्चा भावनिक संघर्षात बदलते. अशा वातावरणात सार्वजनिक जीवनातील व्यक्तींची जबाबदारी अधिक वाढते.

याचा अर्थ इतिहासातील व्यक्तींवर टीका करू नये असा अजिबात नाही. उलट, ऐतिहासिक व्यक्तींवर प्रश्न विचारणे, त्यांच्या निर्णयांचे चिकित्सक मूल्यमापन करणे आणि त्यांच्या कार्यातील विरोधाभास मांडणे हे इतिहासाच्या अभ्यासाचेच अंग आहे. एखादी व्यक्ती राष्ट्रीय जीवनात महत्त्वाची ठरली म्हणून तिच्या प्रत्येक कृतीवर प्रश्न विचारण्यास बंदी असू नये. त्याचप्रमाणे एखाद्या व्यक्तीबद्दल आदर असला म्हणून इतरांनीही त्याच दृष्टिकोनातूनच बोलले पाहिजे, अशी अपेक्षाही लोकशाहीला मान्य नाही. पण टीका आणि अवमान यांच्यातील सीमारेषा ओळखणे आवश्यक आहे. मत म ांडताना व्यक्तीच्या प्रतिष्ठेला अनावश्यक धक्का पोहोचेल का, विधान तथ्यांवर आधारित आहे का आणि त्यातून समाजात अनावश्यक तेढ निर्माण होण्याची शक्यता आहे का, याचा विचार करणे ही सार्वजनिक संवादाची किमान शिस्त आहे.

सावरकर असोत, महात्मा गांधी असोत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर असोत, जवाहरलाल नेहरू असोत किंवा अन्य कोणतीही ऐतिहासिक व्यक्ती त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करण्यासाठी अभ्यास हवा, संदर्भ हवा आणि विवेक हवा. इतिहासाला राजकीय घोषणांच्या सोयीने तुकड्यांत विभागणेही धोकादायक आहे आणि इतिहासातील व्यक्तींना प्रश्नांच्या पलीकडे नेणेही तितकेच अयोग्य आहे.

न्यायालयाचे कामही इतिहासाचा अंतिम अर्थ ठरवणे नाही. न्यायालय कायद्याच्या चौकटीत एखाद्या प्रकरणाची वैधता तपासते. त्यामुळे एखादी फौजदारी तक्रार कायदेशीर कारणामुळे रद्द झाली म्हणून संबंधित ऐतिहासिक वाद संपला असे मानता येणार नाही. तसेच तक्रार दाखल झाली किंवा समन्स बजावले गेले म्हणून त्या तक्रारीतील ऐतिहासिक आरोप सिद्ध झाले, असेही मानता येत नाही. म्हणूनच या प्रकरणातून एक महत्त्वाचा धडा घेता येतो इतिहासावर बोलणे थांबवण्याची गरज नाही; पण इतिहासाबद्दल बोलताना विवेक जागा ठेवण्याची गरज आहे. वाद झाला की लगेच न्यायालय, मानहानीची तक्रार किंवा फौजदारी कारवाई हा पहिला पर्याय बनू नये. गंभीर कायदेशीर हक्कांचा प्रश्न असेल तर कायद्याचा मार्ग उपलब्ध आहेच. पण अनेक ऐतिहासिक मतभेद पुस्तकांमधून, संशोधनातून, सार्वजनिक चर्चेतून आणि वैचारिक प्रतिवादातून सोडवता येतात.

त्याच वेळी बोलणाऱ्यांनीही आपली जबाबदारी ओळखली पाहिजे. इतिहासातील बाबींवर अनावश्यक अतिशयोक्ती करू नये. अपूर्ण माहितीच्या आधारावर ठाम निष्कर्ष मांडू नयेत. एखाद्या व्यक्तीविषयी बोलताना तिच्या प्रतिष्ठेचा विचार करावा. मत मांडण्याचा अधिकार आहे म्हणून कोणतीही भाषा वापरण्याचा अमर्याद अधिकार मिळत नाही. म्हणून उपाय बोलण्यावर बंदी हा नाही आणि बेफाम बोलण्याचे समर्थन करणेही नाही.

योग्य मार्ग म्हणजे अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य आणि अभिव्यक्तीची जबाबदारी यांचा सम तोल. सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण आवश्यक कायदेशीर मंजुरीच्या अभावामुळे थांबवले, त्यामुळे एक अनावश्यक न्यायालयीन संघर्ष संपला. आता त्यातून पुढचा धडा समाजाने घ्यायला हवा. इतिहासावर चर्चा सुरू राहिली पाहिजे; मात्र ती अभ्यासपूर्ण, तथ्याधारित आणि संयमी असली पाहिजे. इतिहासावर बोलण्यास बंदी नसावी; पण बोलताना विवेक जागा असावा. मतभेद असावेत, प्रश्न विचारले जावेत, चिकित्सक विचार व्हावा; मात्र प्रत्येक ऐतिहासिक मतभेदाचे रूप मानहानीच्या किंवा फौजदारी वादात बदलण्याची गरज नाही. इतिहास सम जून घेण्याचा सर्वोत्तम मार्ग न्यायालयीन संघर्ष नव्हे, तर अभ्यास, पुरावे, संवाद आणि विवेक हाच आहे. थोडक्यात, यापुढे इतिहासातील व्यक्तींविषयी बोलताना शब्द, संदर्भ आणि पुरावे तपासणे ही केवळ कायदेशीर गरज नाही; ती सार्वजनिक जीवनातील नैतिक जबाबदारीही आहे, हे लक्षात ठेवण्याची गरज आहे.

**- डॉ. भारत कऱ्हाड,**
प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.

# गुरु रविदास सत्यशोधक समाजाचा गुणवंत व सेवानिवृत्तांचा गौरव सोहळा उत्साहात



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

गुरु रविदास सत्यशोधक समाजाच्या वतीने छत्रपती राजर्षी शाहू महाराज आणि साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त गुणवंत विद्यार्थी तसेच सेवानिवृत्तांचा गुणगौरव व शुभेच्छा सोहळा उत्साहात आयोजित करण्यात आला. सामाजिक, शैक्षणिक व विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचाही यावेळी गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सत्यशोधक प्रबोधनकार अ‍ॅड. डॉ. पी. एस. चंगोले, तर उद्घाटक म्हणून नंदा बालाजी सोनटक्के, उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता अनिल निंभोरे, प्रदेश महासचिव ग. मा. पिंजरकर,पार्वती वसंत चिमकर, साहेबराव दुतोंडे, अंजनाबाई शेषराव टोपे, प्रा. डॉ. गीता हरिष बरोदे, आशा गणेश बरसावणे आणि दुर्गा हिरालाल गतखने आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मानवतावादी व विज्ञानवादी महापुरुषांना अभिवादन करून करण्यात आली. दीपप्रज्वलनानंतर मान्यवरांचा शाल, गौरवचिन्ह, पुष्पगुच्छ व ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी गुरु रविदास सत्यशोधक समाजाच्या मासिकाच्या २८व्या वर्षातील ७व्या अंकाचे लोकार्पणही करण्यात आले.

कार्यक्रमात सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, साहित्य आणि कला क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा विशेष सत्कार करण्यात आला. यामध्ये बालाजी सोनटक्के, सूत्रसंचालन संचालन सी एम रमणे प्रा . जी .के काटकर प्रा प्रियंका पुसे पुजा पुसे डांगे-खडतरे, क्रीडा व योग प्रशिक्षक म हेंद्र रंगारी, बालकलाकार तिशा आकाश गायकवाड तसेच चळवळीला सातत्याने योगदान देणारे सेवानिवृत्त प्रादेशिक अभियंता आर. एन. बनसोडे यांचा गौरव करण्यात आला.

तसेच दहावी, बारावी, पदवी आणि इतर परीक्षांमध्ये उल्लेखनीय गुण मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरवचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी गुणवंत विद्यार्थी आणि सेवानिवृत्तांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमात मान्यवरांनी सामाजिक समता, म ानवतावाद, विज्ञानवाद, शिक्षण आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी संघटित प्रयत्नांची गरज व्यक्त केली. अध्यक्षीय मार्गदर्शनात अ‍ॅड. डॉ. पी. एस. चंगोले यांनी समाजातील गुणवंतांना प्रोत्साहन देणे आणि सामाजिक चळवळीला बळकटी देणे आवश्यक असल्याचे सांगितले.

# निवृत्त मुख्याध्यापक प्रकाश सोनवणे यांचा राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते गुरूवारी सेवागौरव


## ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते डॉ. शेखर मगर संपादीत 'वंचितांचा ज्ञानदीप' या गौरव ग्रंथाचेही होणार प्रकाशन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

ज्ञानसंदीप शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा सेवानिवृत्त मुख्याध्यापक प्रा. प्रकाश सोनवणे यांचा गुरूवारी (२० ऑगस्ट) सकाळी ११ वाजता राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते ‘सेवागौरव’ करण्यात येणार आहे. शासकीय दूध डेअरी जवळील महसूल प्रबोधिनीच्या सभागृहात आयोजित सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी सामाजिक न्यायमंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाट असतील.

यावेळी ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते 'प्रकाश सोनवणे; वंचितांचा ज्ञानदीप' या गौरव ग्रंथाचेही प्रकाशन करण्यात येईल.

ज्येष्ठ पत्रकार डॉ. शेखर मगर यांनी संपादीत केलेल्या या गौरव ग्रंथात ६८ जणांनी लेख लिहिले आहेत. या ग्रंथाला ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक तथा आंबेडकरी चळवळीचे विचारवंत डॉ. ऋषिकेश कांबळे यांची प्रस्तावना आहे. तर भारतीय दलित पँथरचे संस्थापक, मुंबई येथील साहित्यिक ज. वि. पवार यांनी संक्षिप्त टीपण लिहिलेले आहे. प्रा. सोनवणे यांनी अत्यंत प्रतिकुल परिस्थितींत छत्रपती संभाजीनगर शहरात शिक्षण संस्था उभारली. त्यांनी आंबेडकरनगर, मसनतपुरमध्ये शाळा उभारून वंचितांच्या




मुलांसाठी ज्ञानदानाचे कार्य केले.

जाधववाडी, नारेगाव, ब्रिजवाडी आदींसह विविध झोपडपट्यांमधील कामगार, श्रमिक, कष्टकऱ्यांच्या मुलांना मोफत शिक्षण दिले आहे. सोनवणे यांच्या ३८ वर्षांच्या कार्याचा आढावा या गौरव ग्रंथात घेण्यात आला आहे. ३० जून २०२६ रोजी नियत वयोमानानुसार ते मुख्याध्यापक पदावरून निवृत्त झाले आहेत. त्यांच्या निवृत्तीनिमित्त आयोजित या सेवा गौरव सोहळ्यात सोनवणे यांचा मानचिन्ह, मानपत्र, शाल आदींनी बागडे यांच्या हस्ते सपत्निक सत्कार केला जाणार आहे. यावेळी जालन्याचे खासदार डॉ. कल्याण काळे आणि मराठवाड्यातील शिक्षक आमदार विक्रम काळे आणि महापौर समीर राजूरकर यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थित असणार आहे.

ज्येष्ठ साहित्यिक तथा विचारवंत डॉ. ऋषिकेश कांबळे गौरव ग्रंथावर भाष्य करतील. या सोहळ्याला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. शेखर मगर, अशोक कांबळे, माजी नगरसेवक गौतम लांडगे, एकनाथ पाखरे प्रा. विलास पांडे, वसंत राठोड, डॉ. राजेंद्र शेजुळ, बी. बी. शिंदे, संदीप सोनवणे, अभिजीत सोनवणे, किरणकुमार सोनवणे आदींनी केले आहे.

# नागपूरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश आंधळे यांना ‘अति उत्कृष्ट सेवा पदक’



**नागपूर (अट्टल मत प्रतिनिधी)**

१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने पोलीस दलातील उल्लेखनीय व उत्कृष्ट सेवेसाठी भारत सरकारच्या गृहमंत्रालय, नवी दिल्ली यांच्या वतीने देण्यात येणारे ‘अति उत्कृष्ट सेवा पदक’ नागपूर शहरातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश आंधळे यांना प्रदान करण्यात आले.

हा सन्मान राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच पोलीस आयुक्त विश्वास नागरे पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पोलीस सेवेत प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, उत्कृष्ट कामगिरी आणि उल्लेखनीय योगदानाची दखल घेत महेश आंधळे यांची या प्रतिष्ठित सन्मानासाठी निवड करण्यात आली. सन्मान स्वीकारल्यानंतर महेश आंधळे यांनी हा पुरस्कार आपल्या सेवाकाळात मार्गदर्शन करणारे वरिष्ठ अधिकारी, सहकारी अधिकारी व अंमलदार, कुटुंबीय, मित्र आणि हितचिंतक यांच्या सहकार्याचे फलित असल्याचे सांगितले. मिळालेला हा सन्मान देशसेवेत अधिक निष्ठेने आणि समर्पणाने कार्य करण्यासाठी नवी प्रेरणा देणारा असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

या सन्मान सोहळ्यास विविध क्षेत्रातील अधिकारी, कर्मचारी, पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच पत्रकार उपस्थित होते. महेश आंधळे यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील सेवेसाठी शुभेच्छा दिल्या.

# विभागीय माहिती कार्यालयात उत्साहात स्वातंत्र्य दिन साजरा



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या विभागीय माहिती कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय आणि माहिती केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

विभागीय माहिती कार्यालयाच्या प्रांगणात उपसंचालक (माहिती) प्रवीण टाके यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी श्री टाके यांनी सर्व उपस्थित अधिकारी कर्मचारी यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

ध्वजारोहणानंतर उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत राष्ट्रगीताचे सामूहिक गायन केले. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, सहायक संचालक (माहिती) सुरेश पाटील यांच्यासह विभागीय माहिती कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय आणि माहिती केंद्रातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# बेगमपुरा पोलीस स्टेशनहद्दीत अंमली पदार्थविरोधी जनजागृती अभियान व वृक्षारोपन

## विद्यापीठ, बौद्ध लेणी, हनुमान टेकडीसह डीकेएमएम कॉलेज परिसरात विविध उपक्रम; युवकांनी घेतली व्यसनमुक्तीची शपथ





**दिनेश परदेशी (अट्टल मत प्रतिनिधी)**

अंमली पदार्थ तसेच तंबाखूजन्य पदार्थांच्या वाढत्या वापराला आळा घालण्यासाठी बेगमपुरा पोलीस स्टेशनच्या हद्दीत विविध ठिकाणी व्यापक जनजागृती अभियान राबविण्यात आले. या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थी, युवक आणि नागरिकांना अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांची माहिती देत व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन करण्यात आले.

या जनजागृती अभियानांतर्गत विद्यापीठ परिसरात अंमली पदार्थ व तंबाखूजन्य पदार्थांच्या विरोधात जनजागृती करण्यात आली. यावेळी युवक आणि विद्यार्थ्यांना व्यसनाधीनतेमुळे होणारे शारीरिक, मानसिक तसेच सामाजिक दुष्परिणाम समजावून सांगण्यात आले. अंमली पदार्थांचा वापर टाळण्याबरोबरच व्यसनाच्या आहारी गेलेल्या व्यक्तींना योग्य मार्गदर्शन व मदत मिळवून देण्याचे आवाहनही करण्यात आले. याशिवाय अंमली पदार्थविरोधी जनजागृती पुस्तिकांचे वाटप करण्यात आले. या पुस्तिकांमधून अंमली पदार्थांचे धोके, व्यसनाचे दुष्परिणाम आणि व्यसनमुक्त जीवनाचे महत्त्व याबाबत माहिती देण्यात आली. बौद्ध लेणी व ट्रेकिंग परिसरातही युवकांमध्ये जनजागृती करण्यात आली. पर्यटन आणि ट्रेकिंगसाठी येणाऱ्या युवकांशी संवाद साधून अंमली पदार्थ व तंबाखूजन्य पदार्थांपासून दूर राहण्याचा संदेश देण्यात आला. युवकांनी निरोगी जीवनशैली स्वीकारावी आणि इतरांनाही व्यसनमुक्तीसाठी प्रेरित करावे, असे आवाहन करण्यात आले. दरम्यान, हनुमान टेकडी परिसरात वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला. पर्यावरण संवर्धनासोबतच युवकांनी व्यसनमुक्त समाज निर्मितीचा संकल्प करावा, या उद्देशाने उपस्थितांनी व्यसनमुक्तीची शपथ घेतली. व्यसनमुक्ती आणि पर्यावरण संवर्धन या दोन्ही विषयांना जोडून युवकांमध्ये सकारात्मक संदेश देण्यात आला.

तसेच DKMM कॉलेज येथे अंमली पदार्थविरोधी जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. महाविद्यालयीन विद्यार्थी हे देशाचे भविष्यातील आधारस्तंभ असल्याने त्यांनी अंमली पदार्थांच्या आहारी न जाता शिक्षण, क्रीडा आणि सकारात्मक उपक्रमांकडे वळावे, असे मार्गदर्शन करण्यात आले. या संपूर्ण अभियानाची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रविणा यादव यांनी दिली. अंमली पदार्थांच्या वाढत्या धोक्याला प्रतिबंध करण्यासाठी केवळ पोलिसांचीच नव्हे, तर विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि संपूर्ण समाजाची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले. युवकांनी कोणत्याही प्रकारच्या व्यसनापासून दूर राहून आपल्या मित्रपरिवारालाही व्यसनमुक्त जीवनशैली स्वीकारण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन करण्यात आले. बेगमपुरा पोलीस स्टेशनच्या हद्दीत राबविण्यात आलेल्या या विविध उपक्रमांमुळे अंमली पदार्थविरोधी जनजागृतीला व्यापक स्वरूप मिळाले असून युवकांमध्ये व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक गोमटे आणि पोलीस उपनिरीक्षक रामनाथ यादव यांनी या अभियानाच्या जनजागृतीसाठी पुढाकार घेतला.

# संबोधी वन ठरणार छत्रपती संभाजीनगरचे ‘ऑक्सिजन हब’ – समाजभूषण डॉ. भीमराव हत्तीअंबीरे







**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

पर्यावरण संवर्धन आणि हरित परिसर निर्मितीचा संदेश देत संबोधी अकादमी, महाराष्ट्र यांच्या वतीने समाजभूषण डॉ. भीमराव हत्तीअंबीरे यांच्या संकल्पनेतून रविवार, १६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी संबोधी वन येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या उपक्रमात विद्यार्थी, प्राध्यापक, पर्यावरणप्रेमी नागरिक तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. उपस्थितांच्या हस्ते विविध देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. मात्र, केवळ वृक्षारोपण न करता त्यांचे नियमित संगोपन आणि संवर्धन करण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला.

एक व्यक्ती, एक वृक्ष; हरित भविष्यासाठी एक पाऊल  हा संदेश देत प्रत्येकाने आपल्या परिसरात वृक्षलागवड करून लावलेल्या झाडांची जबाबदारीने जोपासना करावी, असे आवाहन करण्यात आले. संबोधी वनामध्ये विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली असून, त्यामध्ये देशी वृक्षांना प्राधान्य देण्यात आले आहे. विशेष म्हणजे, बोधीवृक्ष म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पिंपळाच्या सुमारे ५०० झाडांची लागवड या परिसरात करण्यात आल्याची माहिती समाजभूषण डॉ. भीमराव हत्तीअंबीरे यांनी दिली.

या हरित उपक्रमासाठी अनेक अधिकारी, राजकीय नेते आणि पर्यावरणप्रेमींचे सहकार्य लाभले आहे. वन परिसरात जलसंधारणाच्या दृष्टीने बंधाऱ्याची उभारणी करण्यात आली असून, त्यामुळे परिसरातील पाणीसाठा टिकून राहण्यास मदत होत आहे. परिणामी वृक्षांच्या संगोपनासाठीही अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे.

नुसती झाडे लावणे पुरेसे नाही; लावलेल्या प्रत्येक झाडाचे संगोपन करणे हीच खरी पर्यावरणसेवा आहे,  असे समाजभूषण डॉ. भीमराव हत्तीअंबीरे यांनी सांगितले. भविष्यात संबोधी वन हे छत्रपती संभाजीनगर शहरासाठी महत्त्वाचे ‘ऑक्सिजन हब’ म्हणून विकसित होऊ शकते, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

विद्यार्थी आणि प्राध्यापकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला पर्यावरणपूरक चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. वृक्षलागवडीसोबतच जलसंधारण आणि वृक्षसंवर्धनावर भर देत संबोधी वनाच्या माध्यमातून शहराच्या हरित भविष्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल टाकण्यात आले.

झाडे लावूया, झाडे जगवूया आणि हरित–समृद्ध भविष्य घडवूया! या संदेशाने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# देशभक्तीच्या रंगात रंगले ज्ञान संदीप विद्यालय; विद्यार्थ्यांचा कलाविष्कार

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

ज्ञान संदीप शिक्षण संस्था संचलित ज्ञान संदीप प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मिसरवाडी, छत्रपती संभाजीनगर येथे भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात, आनंदात व देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माननीय प्रकाश सोनवणे सर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री. अभिजीत सोनवणे सर उपस्थित होते.




तसेच पालक प्रतिनिधी महेक नदीम शहा, शमा निलेश वाघ, हमीद शहा तसेच मिसरवाडी वॉर्डातील अनेक पालकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. स्वातंत्र्य दिनानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर गीत, नृत्य, सांस्कृतिक कार्यक्रम व इतर कलाविष्कार सादर करून आपल्या अंगी असलेले कलागुण दाखवून उपस्थित पालकांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त आणि आकर्षक सादरीकरणामुळे संपूर्ण कार्यक्रमाला विशेष रंगत आली. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व, स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान तसेच देशाप्रती असलेली आपली कर्तव्ये याबाबत प्रभावी भाषणे करून आपले मनोगत व्यक्त केले. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून शाळेत भित्तीपत्रक स्पर्धा, चित्रकला स्पर्धा व गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माननीय प्रकाश सोनवणे सर यांच्या हस्ते सन्मानपत्र व बक्षीस देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. आनंद सातदिवे सर यांनी प्रभावीपणे केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमती वैशाली बोरुडे, श्रीमती हर्षला विजय खिल्लारे, श्री. किरणकुमार सोनवणे, श्री. स्वामी जाधव, श्री.अजयकुमार खिल्लारे श्री. गौतम मकसरे, श्री. विजय आघाव, श्री. नय्युम शेख आणि श्रीमती ताहेरा पठाण यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी शाळेच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी आनंदोत्सव साजरा करत स्वातंत्र्य दिनाचा उत्साह द्विगुणित केला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी उपस्थित सर्व पालक, विद्यार्थी व सहकाऱ्यांचे सहशिक्षिका श्रीमती हर्षला विजय खिल्लारे यांनी आभार मानले

# जैन टॅग यांच्या वतीने राजाबाजार येथे प्रथमच पार्श्वनाथ चालीसा पठणाचे आयोजन





**छत्रपती संभाजीनगर (निला सलाम प्रतिनिधी)**

श्री १००८ पार्श्वनाथ भगवान यांच्या मोक्ष कल्याणक महोत्सवानिमित्त तसेच छत्रपती संभाजीनगर शहरात प्रथमच आचार्य श्री विनम्रसागरजी गुरुदेव यांच्या ससंघ सान्निध्यात पार्श्वनाथ चालीसा पठणाचे आयोजन करण्यात आले आहे.

जैन टॅग यांच्या वतीने आयोजित हा भक्तिमय कार्यक्रम बुधवार, १९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५.३० वाजता राजाबाजार येथील हिराकाका प्रांगणात होणार आहे.

‘एक शाम पार्श्वनाथ चालीसा के नाम’ या संकल्पनेतून आयोजित या कार्यक्रमात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन पार्श्वनाथ भगवान यांची चालीसा पठण करून धर्मलाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या मंगलमय कार्यक्रमासाठी पंचायत अध्यक्ष महावीर पाटनी जैन टॅगचा अध्यक्षा जयश्री लोहाडे, उपाध्यक्ष उज्वला पाटणी, सचिव पूजा झांझरी आणि कोषाध्यक्ष सीमा बडजाते यांच्यासह संस्थापक अध्यक्षा अनुपमा दगडा व दीपिका बडजाते आणि जैन टॅगच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी भाविकांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

आचार्य श्री विनम्रसागरजी महाराज यांच्या पावन सान्निध्यात होणाऱ्या या भक्तिमय आयोजनामुळे राजाबाजार परिसरात धार्मिक वातावरण निर्माण होणार असून, सकल जैन समाजातील भाविकांसाठी हा विशेष आध्यात्मिक सोहळा ठरणार आहे.

हे साप्ताहिक  मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक – श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन– ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद  ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199